# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

Astro • Puja • Vastu

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## सीमंतोन्नयन

सीमंतोन्नयन हा आश्वलायन गृह्यसूत्र या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे सोळा संस्कारातील एक महत्त्वाचा संस्कार आहे. या विधीमध्ये पतीने आपल्या गर्भवती पत्नीचा भांग पाडणे असा विधी अभिप्रेत आहे. आधुनिक काळातील दोहपूर्ती किंवा डोहाळेजेवण या प्रथांचे प्राचीन रूप या संस्कारात आहे असे मानले जाते. सर्वसाधारणपणे गर्भधारणेनंतर तिसऱ्या / चौथ्या महिन्यात हा संस्कार "अनवलोभन" या संस्कारासहित करतात. आईच्या उदरातील गर्भाला स्थिरता प्राप्त व्हावी, गर्भपात न होता बलवान गर्भ निपजावा हा या संस्कारामागील हेतू आहे.

### स्वरूप

या विधीमध्ये पती सकाळी स्नान संध्या आणि यज्ञातील आहुती इ. धार्मिक कृत्ये पूर्ण करतो. त्यानंतर साळींदराच्या काट्याने आपल्या तीन महिन्यांची गर्भवती असलेल्या पत्नीचा भांग पाडतो. या काट्यावर तीन ठिपके असणे अपेक्षित असते असे नोंदविलेले दिसते. सीमंत म्हणजे भांग आणि उन्नयन म्हणजे उचलणे. अग्नीत आहुती देवून गर्भवती व गर्भाच्या रक्षणासाठी देवतांना प्रार्थना केल्या जातात. गर्भवती पत्नीच्या मनाचे रंजन होईल असे गायन-वादन इ. कार्यक्रम यानंतर योजावेत असेही सूत्रकार नमूद करतात.

मानवी मस्तक हे अस्थींच्या ५ संधींनी युक्त आहे. मस्तकातील या पंचसंधीला सीमन्त असे म्हणतात. यापंचसंधीचे रक्षण होणे आवश्यक आहे. सीमंतावर म्हणजे पंचसंधीच्या भागावर आघात झाला म्हणजे मेंदूवर आघात होतो. परिणामी मानवाची चलनवलन क्रिया बंद होते. सीमंताचे ठिकाणी मानसिकशक्ति कार्यरत असते. म्हणजेच या सीमंताचे रक्षण, वर्धन करणे अर्थात उन्नयन करणे म्हणजे सीमंतोन्नयन होय. पुंसवन हा संस्कार दुसऱ्या महिन्यात, अनवलोभन व सीमंतोन्नयन हे दोन संस्कार ४ थ्या महिन्यात करतात. वरील तीनही संस्कार एकत्रितपणे ४ थ्या महिन्यात सुध्दा करता येतात. काही कारणास्तव ४ थ्या महिन्यात करणे शक्य झाले नाही तर सहाव्या किंवा आठव्या महिन्यात हे तीनही संस्कार एकत्रित करावेत. हे तीनही संस्कार एकाच दिवशी करण्याच्या पद्धतीने संस्कारांचा विधी दिला आहे.

### योग्य मुहूर्त

अश्विनी, भरगी, कृतिका, रोहिणी, मृग, आर्या, पुनर्वसु, पुष्य, हस्त, स्वाती, अनुराधा, मूज, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, पूर्वभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा यांपैकी नक्षत्र असावे, रविवार, मंगळवार किंवा गुरुवार असावा. चतुर्थी, नवमी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावस्या या तिथी नसाव्यात. क्षय तिथी नसावी, व्यतिपात, वैधृति योग व विष्टि करण नसावे. हे संस्कार गुरु व शुक्राचा अस्त असताना व अधिक मास असताना सुद्धा करता येतात.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com